महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ८५ वे | दिनांक : १८/०३/२०२६ | वार : बुधवार

## ड्रग्जविरोधात 'झिरो टॉलरन्स' धोरण राबवणार - देवेंद्र फडणवीस



**मुंबई** : नागपूर शहरातील मोतीबाग परिसरात अमली पदार्थ (ड्रग्ज) तस्करांविरोधात झालेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर राज्य शासन अमली पदार्थांविरोधात 'झिरो टॉलरन्स' धोरण राबविणार आहे. अशा गुन्ह्यांमध्ये सहभागी आरोपींची संपत्ती जप्त करण्यासह कठोर कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

मोतीबाग येथील ड्रग्ज तस्करांच्या घरांवर छापे टाकून गांजा व अग्निशस्त्रांचा साठा जप्त करण्यात आल्याबाबत सदस्य प्रवीण दटके यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या चर्चेत विकास ठाकरे, विक्रम पाचपुते आणि डॉ. नितीन राऊत यांनी सहभाग घेतला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, संबंधित प्रकरणात सामाजिक गुन्हेगारी नियंत्रण कायदा, १९९९ अंतर्गत विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध चार्जशीट दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पुढील टप्प्यात कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यांच्या मालमत्तेवर जप्तीची कारवाई केली जाणार आहे.बेकायदेशीर बांधकाम आढळल्यास सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार नोटीस देऊन महानगरपालिकेमार्फत योग्य ती कारवाई केली जाईल. तसेच संबंधित भागात विशेष मोहीम राबवून अशा गुन्ह्यांना आळा घालण्यात येईल. भविष्यात अशा घटना घडल्यास संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनाही जबाबदार धरण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

नागपूर पोलिसांनी 'ऑपरेशन थंडर' अंतर्गत मोठ्या प्रमाणावर कारवाया करत गेल्या ११ महिन्यांत ९०७ गुन्हे उघडकीस आणले आहेत. या कारवायांमध्ये सुमारे १२५४ किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आले असून त्यांची किंमत अंदाजे १० कोटी रुपये आहे. राज्यात ड्रग्जविरोधी कारवाई अधिक प्रभावी करण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२३ रोजी अँटी नार्कोटिक टास्क फोर्स (ANTF) स्थापन करण्यात आली आहे. ही यंत्रणा राज्यातील सर्व पोलिस ठाण्यांपर्यंत विस्तारण्यात आली असून नवीन पदनिर्मितीद्वारे ती अधिक बळकट करण्यात आली आहे. केंद्र शासन व इतर राज्यांशी समन्वय वाढवून इंटेलिजन्स शेअरिंग केल्यामुळे आंतरराज्य व आंतरराष्ट्रीय ड्रग्स नेटवर्कवर कारवाई शक्य होत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी नमूद केले.

ड्रग्स प्रकरणांमध्ये केवळ गुन्हा नोंदवून थांबणार नसून 'फॉरवर्ड' आणि 'बॅकवर्ड' लिंक शोधून संपूर्ण साखळी उद्ध्वस्त करण्यावर भर दिला जात आहे. तसेच अशा गुन्ह्यांमध्ये थेट किंवा अप्रत्यक्ष सहभाग आढळणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर निलंबनाऐवजी थेट बडतर्फीची कारवाई केली जाईल. अल्पवयीन मुलांचा ड्रग्स तस्करीत वापर होत असल्याची बाब गंभीर असल्याचे नमूद करत, अशा गुन्ह्यांसाठी कायदेशीर वयोमर्यादा १८ वरून १६ वर्षे करण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार असल्याची माहितीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

## घरगुती गॅससाठी आता 'ई-केवायसी' अनिवार्य : दुर्लक्ष केल्यास कनेक्शन होऊ शकते रद्द




**मुंबई** : घरगुती गॅस (LPG) वापरणाऱ्या कोट्यवधी ग्राहकांसाठी केंद्र सरकारने ई-केवायसी (e-KYC) प्रक्रिया अनिवार्य केली आहे. ही प्रक्रिया पूर्ण न केल्यास ग्राहकांना मिळणारी गॅस सबसिडी बंद होऊ शकते, इतकेच नव्हे तर गॅस कनेक्शन निलंबित होण्याचीही दाट शक्यता आहे. मात्र, ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आता गॅस एजन्सीच्या रांगेत उभे राहण्याची गरज उरलेली नाही. ग्राहक आपल्या मोबाईलवरूनच ही पडताळणी मोफत पूर्ण करू शकतात.

पेट्रोलियम मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, पारदर्शकता आणि योग्य लाभार्थ्यांपर्यंत सबसिडी पोहोचवण्यासाठी बायोमेट्रिक आधार प्रमाणीकरण आवश्यक आहे. ग्राहकांनी जर ही प्रक्रिया टाळली, तर त्यांना दरमहा मिळणारा सबसिडीचा लाभ गमवावा लागेल. तसेच, नवीन सिलिंडर बुक करताना अडचणी येऊ शकतात किंवा कंपनीकडून डिलिव्हरी रद्द केली जाऊ शकते.

सिलिंडर बुकिंगमध्ये अडथळे: तुमचे गॅस बुकिंग स्वीकारले जाणार नाही. सबसिडी मिळणार नसल्याने ग्राहकांना सिलिंडरची पूर्ण किंमत मोजावी लागेल. दीर्घकाळ केवायसी प्रलंबित राहिल्यास गॅस कनेक्शन कायमस्वरूपी निलंबित किंवा ब्लॉक केले जाऊ शकते.

### जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

## स्वयं अर्थ संचिलत शाळा विधेयकावर भास्कर जाधवांचे परखड मत : विनाअनुदानित शाळांच्या आर्थिक टंचाईकडे वेधले लक्ष



**मुंबई** : विधानसभेत महाराष्ट्र स्वयं अर्थ संहिता शाळा आस्थापना अधिनियम विधेयक संमत झाले आहे. या विधेयकातील काही गोष्टींवर शिवसेना ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी आपले मत परखडपणे व्यक्त केले. ज्या शाळांना अनुदान मिळत नाही, अशा शाळांतील शिक्षकांचा पगार देखील कमी असतो. परंतु ज्या शासकीय शाळा आहेत, तिथल्या शिक्षकांना सातवा वेतन आयोग दिले जाते. हा दुजाभाव मिटवला गेला पाहिजे, यासे भास्कर जाधव यांनी यावेळी म्हटले आहे.

भास्कर जाधव म्हणाले, महाराष्ट्र स्वयं अर्थ संहिता शाळा आस्थापना अधिनियम २१२ यामध्ये सुधार करण्यासाठी जे विधेयक आले आहे, हे विधेयक आणत असताना मंत्रीमहोदयांनी सांगितले की महाराष्ट्र स्वयं अर्थ संहिता ज्या शाळा आहेत, त्या स्वयं अर्थ संहिता याविषयी मला जरा संभ्रम होता. तेव्हा अध्यक्षांनी खुलासा की सरकारकडून एकही रुपया न घेता ती संस्था स्वतःच्या पैशांवर शाळा, संस्था उभी केली जाणार असा त्याचा अर्थ मी समजला.

पुढे बोलताना भास्कर जाधव म्हणाले, सरकार एकही रुपया देणार नाही, ते ठीक आहे. पण हे शहरातील शाळांपुर्ते ठीक आहे. ग्रामीण भागातील शाळांचा दर्जा वाढ राहू द्या. कारण या शाळांची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. या शाळा ज्या अनुदानावर चालतात, त्या ग्रामीण भागात सरकार कुठलीही मदत करत नाही. जिल्हा परिषदेच्या ज्या शाळा आहेत, शासकीय माध्यमिक शाळा आहेत, या शाळांना केंद्र सरकारच्या खासदारांचा सुद्धा फंड वापरता येतो, आमदाराचा सुद्धा फंड वापरता येतो, जिल्हा परिषदेचा फंड वापरता येतो. परंतु, या ज्या स्वयंचलित शाळा आहेत विशेषतः इंग्रजी शाळा आहेत, त्यांना कोणीही मदत देत नाही.

भास्कर जाधव म्हणाले, या शाळा चालवणे अत्यंत कठीण झाले आहे. आज आपण सरकारी शाळेतल्या शिक्षकांना ७ वा वेतन आयोग चालू झाला. आणि या मात्र शाळेत १०-१५ वर्ष काम करणारे शिक्षक त्यांना अत्यंत कमी पगार दिला जातो. ही विषमता कशी दूर करणार? प्रत्येक गोष्टीचा दर्जा वाढ तुम्ही मागणार. इतर शाळांच्या पॅटर्न प्रमाणे या शाळांनी फॅसिलिटी तयार कराव्या लागतात, पण या शाळांना तुम्ही मदत करणार नाही. या शाळांना सरकारी अनुदान देण्याची थोडी तरतूद केली पाहिजे. ज्या शाळांना अनुदान मिळते त्यांचा निकाल १०० टक्के लागतो की नाही माहीत नाही. पण ज्या स्वयंचलित शाळा संस्था आहेत, त्यांचा निकाल सातत्याने १०० टक्के लागतो. कारण त्यांना अॅडमिशन याच गोष्टीवरून मिळत असते. हा माझा अनुभव आहे. त्यांना आपल्या संस्थेचे नाव मोठे झाल्याशिवाय आपल्याला अॅडमिशन मिळणार नाही, हे नैतिक बंधन त्यांच्यावर असते म्हणून ते दिवस रात्र, पगार कमी मिळून देखील १०० टक्के निकाल लावण्याचा प्रयत्न करत असतात.

भास्कर जाधव म्हणाले, शिक्षक शेवटी एकच असतो. एकीकडे लाख लाख रुपये पगार दिला जातो, तर दुसरीकडे १०-२० हजार पगार दिला जातो. यात समानता आणायची असेल तर भौतिक वाढीसोबत आर्थिक बळ दिले पाहिजे. हा दुजाभाव आहे. यात अन्याय होत आहे. यात समानता आणली तर हेतु सध्या होईल. अन्यथा आहेत त्या शाळा आणखी कोलमडून पडतील. संस्थाचालक त्यांची संस्था बंद करून टाकतील आणि त्यांची जमीन जी आहे ती विकून टाकतील.

माझा या विधेयकाला विरोध नाही. यात आमचा राजकीय स्वार्थ नाही. हे विधेयक आणत असताना केवळ मंजूरी सहजासहजी देणे एवढ्यापुरते मर्यादित नाही. यात आर्थिक शिस्तीच्या बेड्या तुम्ही टाकत आहात. या संस्था तुम्ही अत्यंत अडचणीत आणत आहेत, असे माझे मत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १८ मार्च २०२६


## इकरा पब्लिक स्कूलचा 'कोहिनूर' चमकला; माजी विद्यार्थी सय्यद शोएबची सीए परीक्षेत गगनभरारी!



**जळगाव :** देशातील सर्वात कठीण आणि प्रतिष्ठेची मानली जाणारी चार्टर्ड अकाउंटंट (CA) ही परीक्षा उत्तीर्ण होऊन सय्यद शोएब सय्यद फारूक याने इकरा पब्लिक स्कूल, मोहाडीच्या यशाच्या परंपरेत एक सुवर्ण पान जोडले आहे. मार्च महिन्याच्या निकालात शोएबने आपल्या बौद्धिक कौशल्याची चुणूक दाखवत हे यश संपादन केले.मूळचे संभाजीनगरचे रहिवासी असलेले सय्यद शोएब यांच्या जडणघडणीत इकरा पब्लिक स्कूलचा मोठा वाटा आहे.शाळेत घालवलेल्या ५ वर्षांच्या काळात त्यांना मिळालेले शैक्षणिक वातावरण आणि शिक्षकांचे मार्गदर्शन त्यांच्या यशाचा पाया ठरले. हायस्कूलचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी सीए होण्याचे ध्येय समोर ठेवले आणि आज ते पूर्ण करून दाखवले.इकरा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. करीम सालार यांनी शोएबच्या यशावर आनंद व्यक्त करताना म्हटले की, "शोएब हा इकराचा खऱ्या अर्थाने कोहिनूर आहे. त्याची मेहनत आणि कधीही हार न मानण्याची वृत्ती (Never Give Up Attitude) आजच्या प्रत्येक विद्यार्थ्यासाठी दीपस्तंभ आहे. जिद्दीच्या जोरावर अशक्य गोष्ट कशी शक्य करता येते, हेच त्याने सिद्ध केले आहे."या देदीप्यमान यशाबद्दल शाळेचे प्राचार्य शेख शकील व सर्व शिक्षक वृंदांनी शोएबचे अभिनंदन केले आहे. "आमच्या शाळेचा माजी विद्यार्थी आज देशाच्या आर्थिक क्षेत्रातील उच्च पदावर पोहोचला आहे, ही आमच्यासाठी सर्वात मोठी गुरुदक्षिणा आहे," अशा भावना प्राचार्य शेख शकील यांनी व्यक्त केल्या.

## लक्ष्मण हाके बारामतीची पोटनिवडणूक लढणार



**पुणे :** अजित पवारांच्या निधनामुळे बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. पण आता ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी या मतदारसंघातून निवडणुकीच्या मैदानात उतरण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. मी ही निवडणूक लढवतो व जिंकूनही दाखवतो. तुम्ही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना विधान परिषदेवर घ्या, असे ते म्हणालेत. त्यामुळे बारामतीची निवडणूक अधिकच रंगतदार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

अजित पवार यांचे गत २८ जानेवारी रोजी एका विमान अपघातात निधन झाले. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या बारामतीत विधानसभा मतदारसंघात २३ एप्रिल रोजी पोटनिवडणूक होणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने दोन दिवसांपूर्वीच या निवडणुकीची घोषणा केली. अजित पवारांच्या दुर्दैवी निधनामुळे ही निवडणूक बिनविरोध होईल असा दावा केला जात होता. तसे सर्वच राजकीय पक्षांनी संकेतही दिले होते. त्यानुसार, राष्ट्रवादी काँग्रेसने येथून अजित पवार यांच्या पत्नी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना विधानसभेवर पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. पण लक्ष्मण हाके यांनी उपरोक्त भूमिका घेतल्यामुळे आता बारामती विधानसभा मतदार संघात निवडणूक होणार हे जवळपास स्पष्ट झाले आहे.

लक्ष्मण हाके मंगळवारी याविषयी बोलताना म्हणाले, सुनेत्रा पवार यांना बिनविरोध विधान परिषदेवर घ्या. बारामतीत पवार वगळता इतर कोणताही उमेदवार द्या. आमचीही निवडणूक लढवण्याची इच्छा आहे. पण आमच्यामुळे काही जणांच्या पोटात दुखते. पण राज्य सरकारच्या अनेक धोरणांच्या विरोधात आम्ही या निवडणुकीला सामोरे जात आहोत. राजकीय पक्षांनी शरद पवारांना राज्यसभेवर बिनविरोध पाठवले. आता सुनेत्रा पवारांनाही बिनविरोध विधानपरिषदेवर पाठवा. मी स्वतः उमेदवार असेन असे नाही. येथील स्थानिक उमेदवारही निवडणूक लढवू शकतो.

मी ही पोटनिवडणूक लढवावी हा आमच्या बारामती येथील कार्यकर्त्यांचा आग्रह आहे. अजित पवारांच्या निधनानंतर अवघ्या तिसऱ्या दिवशी शपथविधी होतो. मग आम्हीच त्यांच्या निधनावर दुःख का व्यक्त करायचे? असा सवालही लक्ष्मण हाके यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे.

## माजी विद्यार्थ्यांचे शाळेप्रती कृतज्ञतेचे देणे, शालेय साहित्या सोबतच शिक्षणाचा आधार



**कन्नड (अरुण थोरात) :** आपल्या कर्तृत्वाने यशाचे शिखर गाठल्यानंतरही आपली नाळ गावाशी आणि शाळेशी जोडून ठेवत, जिल्हा परिषद प्रशाला अंधानेर येथील माजी विद्यार्थी तथा 'मैत्री फोटोग्राफी'चे संचालक प्रशांत वाघ यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक भान जपले आहे. प्रशालेतील गरीब, होतकरू आणि पालक नसलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांनी समाजासमोर एक आदर्श उभा केला आहे.शिक्षणाची जबाबदारी आणि विद्यार्थी दत्तक योजना केवळ साहित्य वाटपावर न थांबता, प्रशांत वाघ यांनी प्रशालेतील दोन गरजू विद्यार्थ्यांना दत्तक घेतले आहे. इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या त्यांच्या संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी त्यांनी स्वीकारली असून, याद्वारे त्यांनी विद्यार्थी दत्तक योजना कार्यान्वित केली आहे. ज्या विद्यार्थ्यांचे पालकत्व नियतीने हिरावून घेतले आहे, त्यांचे शिक्षण पैशांअभावी थांबू नये, हा यामागचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. प्रशालेचे मुख्याध्यापक राजीव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रशांत वाघ यांच्या आई रेखा वाघ, वडील राजेंद्र वाघ यांची प्रमुख उपस्थिती होती.विद्यार्थ्यांना कंपास, रजिस्टर, पेन आणि दप्तर यांसारख्या आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागात शिक्षण घेऊन, आपला फोटोग्राफीचा छंद जोपासत प्रशांतने आज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. यशाच्या शिखरावर असताना आपल्या शाळेला आणि गरजू विद्यार्थ्यांना विसरला नाही, हे अभिमानास्पद असल्याचे मुख्याध्यापक राजीव जाधव म्हणाले. याप्रसंगी शिक्षक संजय केवट, मुख्याध्यापक राजीव जाधव आणि खुद्द प्रशांत वाघ यांच्या मातोश्री रेखा वाघ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सर्वांनीच प्रशांतच्या या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक सोनवणे यांनी केले, यावेळी किरण ताडा, विकी आहेर, अविनाश आहेर, दीपक वाघ, संदीप वाघ, बाळु वाघ, दामोदर थोरात, योगेश गिरी, विकी जाखड, मधुकर रहाणे, कार्तिक जाधव, प्रतीक पंडित यांसह ग्रामस्थ शिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मिळालेल्या या मदतीबद्दल प्रशालेतील विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी प्रशांत वाघ यांचे आभार मानले. ग्रामीण भागातून जिद्दीच्या जोरावर पुढे आलेल्या एका युवकाने आपल्या गावासाठी दिलेले हे योगदान सध्या कौतुकाचा विषय ठरत आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १८ मार्च २०२६


## जिंतूर नगर परिषद कार्यालय येथे उपाध्यक्ष यांचे कक्षाचे उद्घाटन




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर नगरपरिषद निवडणुकीत सलग पाच वेळा निवडून येण्याचा मान प्रभाग १२ जिंतुर चे उमेदवार पठाण मैमुन्नीसा फयाजखा यांनी मिळविला असून माजी आ. रामप्रसाद बोर्डीकर यांच्या आदेशाने व माननीय नामदार मेघना दीदी साकोरे बोर्डीकर पालकमंत्री परभणी व युवा नेते गंगाधरराव कदम बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषद गट नेते सचिन उर्फ मुन्ना गोरे यांच्या प्रयत्नाने नगर परिषद उपाध्यक्षपदी पठाण मैमुन्नीसा बेगम फैयाजखान यांची सर्वानुमते निवड झाली दि. १६ मार्च रोजी नगरपरिषद कार्यालय जिंतुर येथे उपाध्यक्ष यांच्या कक्षाचे उद्घाटन नगरीचे नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख गटनेते मुन्ना गोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी नगर परिषद उमेश ढाकणे, नगरसेवक गोपाळ रोकडे, डॉ दुर्गादास कान्हडकर, हाजी म. अथर, दत्ता कटारे, प्रदीप चौधरी, फेरोज पठाण, प्रदीप चव्हाण, याहिया बेग, किशोर जाधव, आसेफ पठाण, मुन्ना कुरेशी, राजा वैष्णव, कासाबाई बुधवंत, शेख शकील पत्रकार, टीकाखान पठाण, मोसीन पठाण, बाबाखान पठाण, सिराज सिद्दीकी पत्रकार, खुशालराव घुगे यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वयंसेवी वैद्यकीय सेवेला प्रोत्साहन देण्यासाठी सीएमई क्रेडिट गुण प्रणाली

**बीड (भगवंत पाळवदे) :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली ग्रामीण व दुर्गम भागात आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी कार्यरत असलेल्या वैद्यकीय तज्ज्ञांच्या स्वयंसेवी सेवेचा सन्मान आणि प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र वैद्यकीय परिषद (MMC) सातत्याने सकारात्मक पावले उचलण्यात येत आहे. याच अनुषंगाने स्वयंसेवी सेवेकरिता CME (Continuing Medical Education) क्रेडिट गुण प्रणाली अधिक प्रभावी करण्यासाठी स्पष्ट व पारदर्शक धोरण राबविण्यात येत आहे. स्वयंसेवी सेवेसाठी सीएमई (CME) क्रेडिट गुण देण्याबाबत सखोल विचार करून परिषदेकडून सध्या अंमलात असलेल्या प्रणालीची माहिती स्पष्ट करण्यात आली आहे. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने मान्यताप्राप्त असलेल्या संघटना, संस्था, अध्यापन संस्था तसेच वैद्यकीय महाविद्यालयांना ठराविक निकष व मार्गदर्शक तत्वांनुसार CME क्रेडिट गुण प्रदान करण्यात येत आहेत. यामुळे वैद्यकीय व्यावसायिकांचे ज्ञान अद्ययावत राहण्यासोबतच त्यांच्या सामाजिक बांधिलकीलाही चालना मिळत आहे.ग्रामीण, आदिवासी व दुर्गम भागात शस्त्रक्रिया, वैद्यकीय शिबिरे किंवा आरोग्य सेवा देणाऱ्या परंतु अद्याप मान्यता नसलेल्या संस्था, संघटना किंवा रुग्णालयांसाठीही शासनाने स्पष्ट मार्ग खुला करून दिला आहे. अशा संस्थांनी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडून मान्यता (Accreditation) प्राप्त केल्यानंतर त्यांनाही CME क्रेडिट गुण देण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.या निर्णयामुळे एकीकडे वैद्यकीय सेवेच्या गुणवत्तेची खात्री राहणार असून, दुसरीकडे स्वयंसेवी आरोग्य उपक्रम अधिक शिस्तबद्ध, उत्तरदायी आणि परिणामकारक ठरणार आहेत. मान्यता प्रक्रियेमुळे वैद्यकीय शिबिरांचे नियोजन, उपचारांची गुणवत्ता आणि रुग्ण सुरक्षेला प्राधान्य मिळणार आहे.महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या या धोरणात्मक निर्णयामुळे राज्यातील वैद्यकीय व्यावसायिकांना स्वयंसेवी कार्याकडे अधिक प्रेरणा मिळणार असून, शासनाच्या 'सर्वांसाठी दर्जेदार आरोग्यसेवा' या संकल्पनेला बळ मिळणार आहे. वैद्यकीय क्षेत्रातील सेवाभाव, कौशल्यवृद्धी आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा समतोल साधणारी ही CME क्रेडिट गुण प्रणाली राज्याच्या आरोग्य व्यवस्थेसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.






## प्रतिभा निकेतन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी फिरत्या तारांगणाच्या माध्यमातून जाणून घेतले ब्रह्मांडाचे रहस्य



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी फिरत्या तारांगणातून ब्रह्मांडाचे ज्ञान जाणून घेतले. हवा भरून फुगवलेल्या एका डोममध्ये बसून आपण आकाशगंगेची सैर करतो. चंद्र, सूर्य, तारे आपले मित्र वाटायला लागतात पृथ्वीच्या ही पलीकडील ताऱ्यांचे जग डोळ्यांसमोर उलगडत जाते आणि पाहता-पाहता आपल्या ज्ञानाच्या कक्षाही रुंदावतात. ही कल्पना काहीशी अतिरंजीत वाटते. भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल प्रायव्हेट लिमिटेड, जालना व पोलाद स्टील यांच्या संयुक्त विद्यमाने मुरूम येथील इंग्लिश स्कूलमध्ये फिरत्या तारांगण शोमधून ती खरी करून दाखवली आहे. अंदाजे पाच ते आठ मीटर व्यासाचे हवा भरलेले डीजी स्टारचे छोटेसे तारांगण काही क्षणातच आपल्या डोळ्यांसमोर उभे राहते. या डोममध्ये अत्याधुनिक फिश लायलेन्स वापरून उत्तम रिझोल्युशन प्रोजेक्टर मध्यभागी लावण्यात येतो. या डोममध्ये एकावेळी ३५ ते ४० विद्यार्थी सहज सामावून सामावतील इतकी जागा आहे. या उपक्रमाचे उद्घाटन माधवराव पाटील महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रोटरी क्लब मुरूम सिटीचे अध्यक्ष प्रो. डॉ. अप्पासाहेब सूर्यवंशी, राज्यशास्त्र संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. महेश मोटे, वाणिज्य विभागातील डॉ. सुधीर पंचगल्ले, माजी केंद्रप्रमुख कमलाकर मोटे, प्रा. गोपाळ कुलकर्णी आदींची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमाबद्दल कंपनीचे आभार माजी प्राचार्य सच्चिदानंद अंबर यांनी मानले. या शोसाठी कंपनीचे मराठवाडा विभागाचे प्रमुख सुमित दुबे, क्षेत्र व्यवस्थापक तुषार तिवारी, मार्केटिंग अधिकारी समीर करशेट्टी, ऑपरेटर सुरेश क्षीरसागर, दादासाहेब क्षीरसागर, आरजू स्टीलचे मालक मुस्तफा कोतवाल आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका अनुराधा जोशी, डॉ. पुरुषोत्तम बारवकर, जगदीश सुरवसे, पंकज पाताळे, संगमेश्वर लामजाने, धनराज हाळळे आदींनी पुढाकार घेतला. फोटो

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १८ मार्च २०२६


## अवकाळी पाऊस

अवकाळी पावसाने
अचानक पूर आला
बहरलेल्या पिकांना
अचानक चोप दिला

अवकाळी पावसाने
स्वप्न झाले चूर चूर
बळीराजाचा विकास
आता गेले खूप दूर

अवकाळी पावसाने
असा कसा घात केला
हाती आलेल्या पिकाला
मातीमोल करून गेला

माय-बापाचे मेहनत
पावसाने गेले वाया
नासधुस पाहूनिया
करपून गेली काया

अवकाळी पावसाने
पिकावर केला घात
असमानी संकटावर
कसा करू आता मात

बळीराजा हिमतीने
संकटांशी लढतोय
कुटुंबाला सांभाळून
संसाराला ओढतोय




**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**
**९७६३२८३७०४**



प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए

मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


## कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे सार्वजनिक आरोग्य सेवांना मिळणार नवे बळ - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**बीड (भगवंत पाळवदे) :** राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम, तंत्रज्ञानाधिष्ठित आणि लोकाभिमुख करण्याच्या दिशेने राज्य शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence — AI) आधारित आधुनिक उपाययोजनांचा प्रभावी वापर करण्यासाठी राज्य शासन आणि वाधवानी एआय (LEHS AI Unit) या सामाजिक हेतूने कार्य करणाऱ्या ना-नफा-ना-तोटा संस्थेमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार (MoU) करण्यात आला आहे. मुख्यमंत्री श्री फडणवीस यांच्या संकल्पनेतून करण्यात आलेल्या या सामंजस्य कराराअंतर्गत क्षयरोग (TB), मातृ, नवजात व बाल आरोग्य (MNCH), प्राथमिक आरोग्य सेवा, ई-हेल्थ आदी क्षेत्रांमध्ये एआय तंत्रज्ञानाचा समावेश करून आरोग्य सेवांचा दर्जा अधिक उंचावण्यात येणार आहे. राज्यातील शेवटच्या घटकापर्यंत दर्जेदार, वेळेवर आणि प्रभावी आरोग्य सेवा पोहोचवणे हा या भागीदारीचा मुख्य उद्देश आहे.डिजिटल महाराष्ट्र आता पुढील टप्प्यात प्रवेश करत असून कृत्रिम बुद्धिमत्ता सार्वजनिक आरोग्यासाठी 'फोर्स मल्टिप्लायर' ठरणार आहे. वाधवानी एआयच्या सहकार्याने एआय सक्षम आरोग्य व्यवस्था उभारणार असल्याचे श्री फडणवीस म्हणाले.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, क्षयरोग, प्राथमिक आरोग्य सेवा आणि मातृ-बाल आरोग्यासाठी एआय साधनांचा वापर केल्यास लवकर निदान, सुलभ सेवा आणि अग्रिम कर्मचाऱ्यांना वेळेवर मार्गदर्शन मिळेल. ही भागीदारी राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम व सक्षम बनवेल.वाधवानी एआयचे प्रमुख शेखर शिव सुब्रमणियन यांनीही या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त करताना सांगितले की, महाराष्ट्र शासनाबरोबरची ही भागीदारी नवोन्मेष, समता आणि दीर्घकालीन परिणाम साधणाऱ्या आरोग्य सुधारणांसाठी महत्त्वाची ठरेल.या सामंजस्य करारामध्ये पुढील बाबींचा समावेश आहे.क्षयरोग निर्मूलनासाठी एआयचा प्रभावी वापरया उपक्रमांतर्गत क्षयरोग रुग्णांमध्ये उपचार सोडून देण्याचा धोका, उपचारातील अडथळे व मृत्यूची शक्यता उपचाराच्या सुरुवातीलाच ओळखण्यासाठी एआय आधारित प्रणाली वापरण्यात येणार आहे. त्यामुळे उच्च जोखमीच्या रुग्णांवर वेळेत लक्ष देऊन योग्य उपचार करता येणार आहेत.'Cough Against TB' या एआय आधारित ॲप्लिकेशनच्या माध्यमातून खोकल्याच्या आवाजाचे विश्लेषण करून क्षयरोगाची प्राथमिक ओळख आरोग्य संस्थांमध्ये जलदगतीने करता येणार आहे.याशिवाय, उपगाव पातळीवर (५०० मी. x ५०० मी.) क्षयरोगाचा धोका दर्शविणारे व्हल्नरेबिलिटी मॅपिंग तयार करण्यात येणार असून, लोकसंख्या घनता, आरोग्य सुविधा, प्रदूषण, कुपोषण यासारख्या घटकांचा अभ्यास करून सक्रिय रुग्ण शोध (ACF) मोहिमा अधिक परिणामकारक रितीने राबविता येणार आहेत.ई-हेल्थ व प्राथमिक आरोग्य सेवांना गतीराज्याच्या ई-संजीवनी टेलिमेडिसीन सेवेमध्ये एआय आधारित Clinical Decision Support System (CDSS) समाविष्ट करण्यात येणार आहे. यामुळे डॉक्टरांना अचूक निदान व रुग्णांच्या तक्रारींचा संक्षिप्त आढावा घेणे सुलभ होणार आहे. मधुमेही रुग्णांसाठी 'मधुनेत्रा' या एआय प्रणालीद्वारे डोळ्यांच्या तपासणीस मदत होणार असून आवश्यकतेनुसार तज्ज्ञांकडे रुग्णांना संदर्भित करता येणार आहे. 'हेल्थ वाणी' या एआय आधारित संवाद सहाय्यकाच्या माध्यमातून आशा, एएनएम यांसारख्या अग्रिम आरोग्य कर्मचाऱ्यांना मोबाईलवरच प्रशिक्षण, मार्गदर्शन व प्रमाणित माहिती सहज उपलब्ध होणार आहे.मातृ व बाल आरोग्यासाठी अभिनव तंत्रज्ञान'शिशु मापन' या एआय आधारित ॲप्लिकेशनमुळे केवळ स्मार्टफोन व साध्या मोजमापाच्या साधनांच्या सहाय्याने नवजात शिशूचे वजन, लांबी, डोके व छातीचा घेर मोजणे शक्य होणार आहे. घरभेटीद्वारे ४२ दिवसांपर्यंत नवजात शिशूंची काळजी अधिक प्रभावीपणे घेता येणार आहे.नेतृत्वाचे मतसमावेशक व तंत्रज्ञानाधारित आरोग्य महाराष्ट्राच्या दिशेने वाटचालसध्या देशभरात वाधवानी एआयच्या उपाययोजनांद्वारे १५ कोटीहून अधिक लोकांपर्यंत सेवा पोहोचत असून, आरोग्य, शेती व शिक्षण क्षेत्रात सामाजिक परिवर्तन घडविण्यात संस्थेचा मोलाचा वाटा आहे. या सामंजस्य करारामुळे राज्यात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने अधिक सक्षम, समावेशक आणि लोककल्याणकारी सार्वजनिक आरोग्य व्यवस्था उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## शाळेतून घरी निघालेल्या चिमुकलीवर ॲसिड हल्ला

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथे एक अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक घटना घडली असून, शाळेत सहावीत शिकणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर ॲसिड हल्ला करण्यात आला आहे. या भ्याड हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला असून परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने शाळेत धाव घेतली आहे.
अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथे शाळा सुटल्यानंतर घरी परतणाऱ्या इयत्ता सहावीतील एका अल्पवयीन विद्यार्थिनीवर अज्ञात तरुणाने ॲसिड हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही मुलगी शाळेतून घराच्या दिशेने जात असताना अचानक समोर आलेल्या एका युवकाने तिच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकले. मुलीने आरडाओरड केल्यामुळे आजूबाजूचे नागरिक तातडीने मदतीला धावून आले, परंतु तोपर्यंत आरोपीने तिथून पळ काढला होता. पीडित मुलीला तात्काळ उपचारासाठी लोणी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.
घटनेची माहिती मिळताच पोलिस प्रशासन सतर्क झाले असून पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत तपासाला सुरुवात केली आहे. ॲसिड फेकणाऱ्या अज्ञात नराधमाचा शोध घेण्यासाठी विविध पथके तैनात करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, अवघ्या दोन दिवसांपूर्वीच संगमनेरमधील रणखांब गावात लग्नास नकार दिल्याने एका तरुणीवर प्राणघातक हल्ला झाला होता. ही घटना ताजी असतानाच आता थेट शाळकरी मुलीवर झालेल्या ॲसिड हल्ल्यामुळे संपूर्ण तालुक्यात भीतीचे आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन


महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १८ मार्च २०२६

# लेखक घडविणारा प्रकाशक अतकरे (बापू)



दैनिक वृत्तरत्न 'सम्राट'मध्ये स्तंभलेखन करणारे, समाजातील एक काळजीवाहू व्यक्तिमत्त्व जे अलीकडेच निवर्तले असे स्मृतिशेष अॅड. गोपाल सोनखेडे, औरंगाबाद शहरातला हा निवासी ममताळू माणूस ज्यांचा माझ्यावर जीव होता. मुंबईचे ज्येष्ठ समीक्षक हरीश खंडेराव, प्रा. अविनाश डोळस मला लिहिते करणारे सम्राटकार बबन कांबळे आणि साहित्य सृजनातील, प्रकाशक जगतातील एक महत्त्वाचे नाव म्हणजेच कैलास पब्लिकेशन सर्वेसर्वा औरंगाबादचे आदरणीय अतकरे बापू!

कैलाश पब्लिकेशन, अतकरे बापू हे नाव अनेकदा ऐकलेले काही वेळा त्यांना ऐकण्याची संधीही मिळाली. परंतु काही खास औचित्य नव्हते. जेव्हा माझ्या पहिल्या कादंबरीचे पुस्तकरूपाने, साहित्यातले पदार्पण करताना बाळातणीला ज्या वेणा (वेदना) सहन कराव्या लागतात त्या वेणांची तीव्रता कमी करण्यामध्ये प्रकाशक म्हणून महत्त्वाचे योगदान राहिले ते म्हणजे आदरणीय बापू! अॅड. गोपाल सोनखेडे सरांचे ते निकटचे सहकारी मित्र समवयस्क असल्यामुळे दोघांची वैचारिक मैत्री. सरांनीच माझ्यावतीने प्रस्तावना अर्थात परिचय दिला. कोंडबा हाटकर हा नव्या वर्तमान पिढीतला चांगला वैचारिक स्फूटलेखन करणारा लेखक आहे. त्यांनी सीएच.बी. अर्थात रोजंदारी प्राध्यापकांची होणारी हेळसांड 'बेदखल' ह्या कादंबरीच्या रूपाने मुखर करण्याचा प्रयत्न केला आहे. ज्वलंत प्रश्नावर केलेलं हे लिखाण आहे. आपण त्याला ग्रंथात्मक रूप द्यावे अशा प्रकारचा मैत्रीपूर्ण संवाद माझ्या समक्ष कैलाश, पब्लिकेशनच्या कार्यालयात झाला व तेथेच माझं पहिलं साहित्यपुष्प फुलले.

माझ्या वैचारिक लेखनाच पहिलं पदार्पण (बारा वर्षापूर्वी) झालं ते आंबेडकरी चळवळीचं मुखपत्र असलेल्या दैनिक सम्राटमधून जेव्हा कैलास पब्लिकेशनने माझ्या पहिल्या ग्रंथाच प्रकाशन केल्यावर मला जेवढा मनस्वी आनंद झाला तितकाच आनंद मला स्मृतिशेष आदरणीय कांबळे साहेबांच्या 'सम्राट'ने दिलाय हा आंबेडकरी चळवळीतल्या परिघातला अंश मी कृतज्ञतेने जपून ठेवला आहे. सत्तर पेक्षा अधिक लेख दै. 'सम्राट'मधून आले आहेत. त्याचप्रमाणे माझ्या दोन्ही कादंबऱ्या बापुच्या कैलासनी प्रकाशित केल्या आहेत. महाविद्यालयाशी संबंधित अर्थात अभ्यासक्रमाशी असलेली पुस्तके 'कैलास'नी काढलेली आहेत. त्याचसोबत वैचारिक लेखनाचे नानाविध ग्रंथ बापूनी प्रकाशित केली आहेत. बहुजन, तथा आंबेडकरी चळवळीला गतिमान करणारी अनेक पुस्तके त्यांनी प्रकाशित केली आहेत. औरंगाबाद स्थित एक जुनी (लेखनातील नाविन्यासह) प्रकाशन संस्था म्हणून कैलास पब्लिकेशनचा उल्लेख करावा लागेल. अतकरे बापूंच्या नेतृत्त्वाने नवी नाममुद्रा साहित्य प्रकाशन निर्मितीच्या परिघात निश्चितपणे उमटली आहे. स्वच्छ प्रतिमा असलेला, निर्लोभी मनाचा आपल्या साहित्य व्यवहारात पारदर्शी व असलेला व आपल्या प्रकाशन संस्थेला आपल्या मुळासारखं सांभाळणाऱ्या कुडलिक अतकरे बापूना मनातून समाधान वाटते. ते आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक आहेत. बापू म्हणजे एक स्वतंत्र व्यक्तित्त्व तर आहेच पण ती एक संस्था आहे असे मी मानतो. कारण महाराष्ट्रातल्या पुरोगामी विचारांशी एकनिष्ठ असलेला हा प्रकाशक माणूस आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातला एक गुण म्हणजे ते तत्त्व आणि विचारांशी कधी तडजोड करीत नाहीत. भलेही ते तोटा सहन करतील त्यामुळे माणूस सहनशील बनतो. उजळतो अशी त्यांची भावना आहे. प्रकाशकानी लेखक, कवीसारखे संवेदनशील असावे हे माझ्या तरी दृष्टिपथास जास्त आलेली बाब नाही. मी महाराष्ट्रातल्या जवळपास बारा-तेरा प्रकाशकांशी बोललो आहे. अनेकजण मला तरी कमर्शियल अर्थात व्यवहारी वाटले. व्यवहारी असावे परंतु फक्त 'व्यवहार' नफा ह्याच दृष्टीने प्रकाशक पहात असेल तर लेखक कसे घडतील? लेखक, नवलेखक घडविण्यामध्ये प्रकाशकांची भूमिका महत्त्वाची असते. नव्या सृजनशील लेखकाला जन्मूच द्यायचे की नाही. नाव असे काही मूलतत्त्ववादी प्रकाशकांची संकीर्ण भूमिका माझ्या प्रत्ययास आली. काहीजण तर मोठे गमतीशीर नव्या लेखकांनी आम्हाला बुडविले आहे असे बोलणारे पुण्या-मुंबईतले मोठे-मोठे प्रकाशक आहेत त्यांच्या कारखानदारासारखा साहित्यातला व्यवहार मला डाचलेला आहे. याला अनेक प्रकाशक अपवादही आहेत. त्यापैकीच बापूचे कैलास पब्लिकेशन आहे. साधी राहणी असलेला नितळ मनाचा निर्गवी असणारा हा माणूस आहे. हा 'माणूस' एक संस्था आहे. यामागे पार्श्वभूमी अशी आहे की, मराठवाडा साहित्य परिषदेच्या व्यवस्थापनात अतकरे बापूंची भूमिका मोलाची राहिलेली आहे. मराठवाडा विभागाच्या ह्या प्रमुख साहित्य संस्थेला जे आज बाळसं आलेलं आहे. त्यामध्ये पदाधिकारी म्हणून कोषाध्यक्ष या पदावर निरपेक्ष भावनेनी त्यांनी कार्य केले आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळावर दोन दशकापेक्षा अधिक काळ बापू कार्यरत होते. त्याच मंडळावर सेक्रेटरी (सचिव) म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. म्हणजेच प्रकाशन व्यवसाय फक्त व्यवसाय म्हणून न पाहता ह्या महत्त्वाच्या संस्थावरही मौलिक कामगिरी बापूनी केली आहे आणि विशेष म्हणजे कुठलाही अभिनिवेश न ठेवता काम करीत राहणे हा बापूंच्या व्यक्तित्त्वाचा एक खास गुण आहे. मला आता काही जबाबदाऱ्या मधून कार्यमुक्त करा अशी निस्वार्थपणाची सार्थ अपेक्षा बापूंनी म.सा.प.च्या संचालक मंडळासमोर बोलून दाखवली. ते सद्य:स्थितीत पदमुक्त आहेत. 'अहंकाराचा वारा न लोगो राजसा' ह्या संतोक्ती प्रमाणे बापूचं आचरण आहे. त्यांच्या वाणीमध्ये सहजभावाचा गोडवा आहे. नव्या माणसांना साहित्य परिषदेमध्ये तथा इतर संस्थेतही संधी मिळाली पाहिजे. आपणच किती दिवस? हा मनाचा प्रामाणिकपणा फार कमी लोकांमध्ये असतो. मृत्यूपंथापर्यंत पदाला चिटकून असणारी अनेक मंडळी आपण पाहतो. बापू त्याला अपवाद आहेत. म.सा. परिषदेचे विश्वस्त विश्वासू असेल तोच विश्वस्त परंतु काही अपवाद वगळता अनेक संस्थाचे विश्वस्त अविश्वासू आहेत. हे वास्तव नाकारता यावयाचे नाही.

नारळाच्या पाण्यासारखी मधूर वाणी असलेला हा कर्तबगार माणूस आहे. समाजवादी, धर्मनिरपेक्ष ह्या संविधानिक मूल्यांवर निष्ठा असलेली ही व्यक्ती सरळमार्गी आहे. महाराष्ट्राचे एक सांस्कृतिक स्थळ म्हणून पंढरपूरचा लौकिक आहे. हा त्या परंपरेतला माणूस आहे. फुले-आंबेडकरी विचारांचा विचारवसा घेऊन कुळवाडीभूषण छ. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील न्यायनिष्ठ भूमिकेला जतन करणारी व्यक्ती म्हणून बापूंचा उल्लेख मला मौलाचा वाटतो. मराठी साहित्य विश्वातील तथा दलित-आंबेडकरी साहित्य विचारकक्षेतील एक महत्त्वाचे नाव म्हणजे ज्येष्ठ समीक्षक, दलित साहित्याचे भाष्यकार स्मृतिशेष पद्मश्री डॉ. गंगाधर पानतावणे यांचे मानसपूत्र प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे सर व अतकरे बापू यांच्या मध्ये जी मैत्राभावना जागृत झाली आहे, स्थिरावली आहे ती मैत्री अतुट, अजोड अशीच म्हटली पाहिजे. संध्याकाळी बापूच्या ऑफिसात कुणी असो नसो पण तेथे दिसणारी हमखास व्यक्ती म्हणजे डॉ. ऋषिकेश कांबळे! हे खरं म्हणजे मित्रप्रेम आहे. अलीकडेच कांबळे सरांच्या सेवानिवृत्तीनंतर कैलास प्रकाशनानी कांबळे सरांवरचे प्रेम, आत्मियतेचा भाव म्हणून गौरव ग्रंथाची निर्मिती केली आहे. स्वत: प्रति धन्यवादी असणं हे अनेकांना शक्य होत नाही. बापू त्याला अपवाद आहेत. बापूप्रति कृतज्ञता भान ठेवूनव त्यांना उर्वरित आयुष्य सुख समृद्धीचे जावो अशी बुद्धाचरणी वंदना करतो, थांबतो.



डॉ. कोंडबा भगवान हाटकर

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १८ मार्च २०२६


# पुतळ्यांच्या ओझ्याखाली दबलेला महाराष्ट्र - उंचीची शर्यत की विचारांचा पराभव?

महाराष्ट्र हा महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्याय, समता आणि शिक्षणाच्या क्रांतिकारी विचारांनी घडलेला प्रदेश आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याच्या संकल्पनेत लोककल्याण केंद्रस्थानी होते, तर यशवंतराव होळकर यांच्या पराक्रमात स्वाभिमान आणि लोकहिताची जाणीव होती. या सर्वांच्या विचारांनी महाराष्ट्राला वैचारिक उंची दिली.परंतु आज गावोगावी, शहरोशहरी वेगळीच उंची वाढताना दिसते — ती म्हणजे पुतळ्यांची उंची. विकास, उद्योग, शिक्षण, शेती, रोजगार यांवर चर्चा व्हावी अशी अपेक्षा असताना, स्पर्धा मात्र पुतळ्यांच्या उभारणीची सुरू झालेली दिसते. जणू विकासाची व्याख्या बदललेली आहे. जिथे पाण्याची टाकी उभी राहायला हवी होती, तिथे संगमरवरी चौथरा दिसतो; जिथे मुलांना खेळण्यासाठी मैदान हवे होते, तिथे लोखंडी ग्रील आणि सजावटीचे दिवे उभे राहतात.नक्कीच, महापुरुषांविषयी आदर असणे आवश्यक आहे. त्यांच्या स्मृती जपल्या पाहिजेत. पण स्मृती जपण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांच्या विचारांची अंमलबजावणी. महात्मा फुले यांच्या शिक्षणाच्या विचारांवर चालत शाळा उभ्या राहिल्या पाहिजेत. राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक समतेच्या तत्त्वांवर योजना राबल्या पाहिजेत महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानिक मूल्यांवर समाज उभा राहिला पाहिजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य संकल्पनेप्रमाणे लोकहिताचे प्रशासन उभे राहिले पाहिजे.म्हणूनच आज गरज आहे ती पुतळ्यांच्या स्पर्धेऐवजी विचारांच्या स्पर्धेची. कोणता गाव अधिक साक्षर आहे? कोणता तालुका अधिक रोजगारनिर्मिती करतो? कोणते शहर अधिक पर्यावरणपूरक आहे? अशी स्पर्धा सुरू झाली तरच महाराष्ट्राची खरी परंपरा जपली जाईल.आज गावोगावी तरुणांची "आपला" महापुरुष आणि "आपला" पुतळा अशी संकुचित मानसिकता तयार होताना दिसते. प्रत्येक समाजघटकाने एखाद्या महान व्यक्तिमत्त्वाला आपला प्रतिनिधी मानले आहे हे स्वाभाविक आहे. पण जेव्हा त्या अभिमानाचे रूपांतर स्पर्धेत होते तेव्हा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा बनतो. आज परिस्थिती अशी झाली आहे की एका समाजगटाने पुतळा उभारला की दुसऱ्याला अस्वस्थता येते. "आपला पुतळा कुठे?" हा प्रश्न विचारला जातो. मग स्पर्धा सुरू होते. उंची किती? जागा किती मोठी?आपला महापुरुष कॉंक्रीटमध्ये, ब्राँझमध्ये उभा करणे म्हणजे आदर व्यक्त करणे हे मान्यच. परंतु जेव्हा कायदेशीर प्रक्रिया, प्रशासनाची परवानगी, सामाजिक समन्वय या गोष्टी जाचक वाटू लागतात तेव्हा समस्या जटिलता वाढत जाते. अशा तरुणांच्या फौजांन या कायदेशीर प्रक्रिया जाचक वाटतात तेंव्हा अनेक ठिकाणी रात्रभरात क्रेन उभी राहते आणि पहाटेपर्यंत पुतळा सज्ज होतो. सकाळी फुलांचे हार, डीजे, घोषणा, सोशल मीडियावर थेट प्रक्षेपण आणि काही दिवस गाव "अभिमानाच्या क्षणात" रमून जाते.खरं तर असा प्रवाह संविधान विरोधी आहे याचे भान त्यांना राहत नसते. आज मात्र परिस्थिती अशी आहे की एका गावात दहा फूट पुतळा उभा राहिला, तर दुसऱ्या गटाकडून "एक इंच मोठा" पुतळा उभारण्याची मागणी होते. जणू इतिहासाची उंची इंचांवर ठरते. कार्य, विचार, समाजकारण बाजूला पडते आणि उरते ती केवळ उंचीची शर्यत. प्रतिष्ठेचा प्रश्न, जातीय अस्मितेचा प्रश्न, स्पर्धेची भावना या सगळ्यांतून पुतळा एक प्रतीक न राहता संघर्षाचे कारण बनतो. अनेक वेळा हे पुतळे कायदेशीर परवानगीशिवाय उभे राहतात. रात्रीतून काम पूर्ण होतं. सकाळी प्रशासनासमोर "झाले ते झाले" अशी स्थिती निर्माण होते. अधिकारी प्रश्न विचारतात तर त्यांच्यावर महापुरुषांचा अपमान केल्याचा आरोप होतो. कायद्याचे राज्य भावना आणि दबावाखाली कोसळते. लोकशाहीत नियम सर्वांसाठी समान असतात; पण पुतळ्यांच्या बाबतीत नियमांनाही भावनांची माळ घातली जाते.एक इंच जास्त उंची म्हणजे एक इंच जास्त प्रतिष्ठा, असा भाबडा पण धोकादायक समज तयार झाला आहे. या स्पर्धेत विवेक हरवतो, संवाद हरवतो, आणि उरते ती केवळ आक्रमक घोषणांची धुरळलेली हवा.आज गावा गावात कितीतरी पुतळे बेकायदेशीरपणे उभे अतिक्रमाणे उभे केले आहे. हे सगळे प्रशासनाला माहिती नाही असे नक्कीच नाही. पण प्रशासन हतबल आहे. कालपर्यंत ज्या गावात शाळेची इमारत अपुरी होती, दवाखान्यात डॉक्टर नव्हता, रस्त्यांवर खड्डे होते, तिथे अचानक पुतळा उभा राहतो. प्रश्न असा पडतो की आपल्या प्राधान्यक्रमात काय पुढे आहे? स्मरण की समाधानगावागावात सुरू असलेले हे "पुतळा युद्ध" अनेकदा छुप्या जातीय स्पर्धांना खतपाणी घालते. समाज एकत्र येण्याऐवजी विभागला जातो. महापुरुषांचे नाव घेऊन भिंती उभ्या राहतात खरा आदर म्हणजे त्यांच्या विचारांची अंमलबजावणी. जर एखाद्या महापुरुषाच्या नावाने ग्रंथालय उभे राहिले, अभ्यासिका सुरू झाली, शिष्यवृत्ती दिली गेली, रुग्णालयात सुविधा वाढल्या तर तो पुतळ्यापेक्षा मोठा स्मारक ठरेल. कारण कॉंक्रीटचा पुतळा शांत उभा राहतो पण विचारांचे स्मारक समाज बदलते.म्हणूनच आज गरज आहे ती उंचीच्या इंचांची नव्हे, तर विचारांच्या उंचीची. अन्यथा आपण पुतळे उंच करत राहू, पण समाजाची उंची मात्र नकळत कमी होत जाईल. ज्या भूमीत शिस्त, जबाबदारी आणि लोककल्याण संविधान हे शब्द इतिहासात कोरले गेले, त्याच भूमीत आज प्रतीकांची उंची वाढवून आपण समाधान मानतो.प्रत्येक तालुक्यात, प्रत्येक वस्तीत पुतळे उभे राहत आहे. पण त्यांच्या विचारांचा काय? पण त्यांचे विचार किती जणांच्या कृतीत उतरते? त्यांच्या नावाने राजकारण करणे सोपे आहे; त्यांच्या तत्त्वांवर समाज उभा करणे कठीण आहे. म्हणून आपण कठीण मार्ग टाळतो आणि सोपा मार्ग निवडतो पुतळा उभारतो, उद्घाटन करतो, भाषणे देतो, फोटो काढतो आणि पुढच्या निवडणुकीची गणिते मांडतो.पुतळा उभा करणे म्हणजे त्यांचे विचार आत्मसात करणे असे नक्कीच नाही. या शर्यतीचा आर्थिक चेहराही कमी भयंकर नाही. एखादा मध्यम आकाराचा ब्राँझ पुतळा, त्याची उभारणी, परिसर सुशोभीकरण, उद्घाटन समारंभ हे सगळं मिळून सहज पंधरा ते पंचवीस लाखांच्या घरात जातं. महाराष्ट्रात जर अशा हजारो पुतळ्यांची उभारणी झाली असेल, तर हा खर्च हजारो कोटींमध्ये पोहोचणं आश्चर्यकारक नाही. हा पैसा कोठून येतो? स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निधीतून, देणग्यांमधून, राजकीय पाठबळातून पण शेवटी तो सार्वजनिक संसाधनांचा भाग असतो. आज महाराष्ट्रात 10 हजार लोकसंख्येमागे एक पुतळा असे समीकरण असावे इतके पुतळे उभे राहत आहेत. ही गती अशीच राहिली, तर 100 लोकांमागे एक पुतळा होणेही दूर नाही.कल्पना करा दोन ते पाच हजार कोटी रुपये जर केवळ पुतळ्यांवर खर्च झाले असतील, तर ही रक्कम किती मोठी आहे? देशातील काही लहान राज्यांचे वार्षिक अर्थसंकल्प दहा-पंधरा हजार कोटींच्या घरात असतात. म्हणजे एका राज्यात केवळ स्मारकांवर झालेला खर्च हा एखाद्या छोट्या राज्याच्या संपूर्ण वर्षभराच्या प्रशासन, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा यासाठीच्या बजेटच्या मोठ्या भागाइतका ठरतो. तुलना केवळ आकड्यांची नाही ती प्राधान्यक्रमांची आहे.महाराष्ट्र हा प्रगत, औद्योगिक, आर्थिकदृष्ट्या सक्षम राज्य म्हणून ओळखला जातो. राज्याचा एकूण अर्थसंकल्प लाखो कोटींच्या घरात आहे. पण म्हणूनच प्रत्येक कोटीचा वापर विचारपूर्वक व्हायला हवा. गावात अजूनही पिण्याच्या पाण्याची समस्या आहे, शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता आहे, सरकारी रुग्णालयांत साधनसामग्री अपुरी आहे. तरुणांना रोजगार नाही, शेतकरी कर्जात बुडाले आहेत. अशा वेळी पुतळ्यांवर कोट्यवधी रुपये खर्च करणं हा केवळ भावनिक निर्णय आहे का, की तो राजकीय सोयीचा पर्याय आहे?पुतळा उभा करणं सोपं आहे. भूमिपूजन, उद्घाटन, फीत कापणे, भाषणं सगळं एका कार्यक्रमात उरकता येतं. पण एखाद्या शाळेचा दर्जा उंचावणं, आरोग्य व्यवस्था सुधारणं, शेतीसाठी पाणीपुरवठा सक्षम करणं ही दीर्घकालीन, कष्टसाध्य कामं आहेत. त्यामुळे प्रतीकांवर भर देणं अधिक सोपं वाटतं. लोकांच्या भावना तात्काळ पेटवता येतात, कौतुकाची दाद मिळते, राजकीय उपस्थिती दृश्यमान होते.पुतळ्यांवरून वाद होतात. जागेवरून तणाव निर्माण होतो. एखाद्या पुतळ्याची विटंबना झाली जाणीवपूर्वक किंवा चुकून की वातावरण तापतं. बंद, मोर्चे, घोषणाबाजी आणि पुन्हा एक नवा पुतळा. सोशल मीडियावर अफवा पसरतात. समाजगट आमनेसामने उभे ठाकतात. काही तासांत शांत गाव पेटतं. हा चक्रव्यूह समाजाला अधिक अस्थिर करतो. पुतळा स्मरणाचं प्रतीक असतो; पण तो मतभेदांचं केंद्रबिंदू बनला, तर त्यामागचा हेतू हरवतो.महापुरुषांची प्रतिष्ठा पुतळ्यांच्या संख्येवर ठरते का? त्यांच्या नावाने किती चौक आहेत यावर महानता अवलंबून असते का? एखाद्या विचारवंताने शिक्षणासाठी आयुष्य झिजवलं असेल, तर त्याच्या नावाने वाचनालय उभं राहणं अधिक सुसंगत नाही का? एखाद्या समाजसुधारकाने समतेसाठी लढा दिला असेल, तर त्याच्या स्मरणार्थ समता अभियान, शिष्यवृत्ती योजना, प्रशिक्षण केंद्र उभारणं अधिक अर्थपूर्ण नाही का?जागेचाही प्रश्न महत्त्वाचा आहे. पाच गुंठे जमीन म्हणजे गावासाठी मौल्यवान संपत्ती. त्या जागेत अंगणवाडी, व्यायामशाळा, सामुदायिक सभागृह उभं राहू शकतं. पण ती कायमस्वरूपी स्मारकासाठी राखीव होते. शहरात चौकांमध्ये उभे राहणारे पुतळे वाहतुकीच्या दृष्टीने अडथळा निर्माण करतात. नगररचना ही नियोजनावर चालते; भावना तिचं स्थान घेतात तेव्हा विसंगती निर्माण होते.या सगळ्याच्या पाठीमागे एक मानसिकता दिसते "आपला महापुरुष मोठा आहे, म्हणून त्याचा पुतळा मोठा हवा." ही भावना अभिमानाची असली तरी ती स्पर्धेत बदलली की विभागणी निर्माण करते. महापुरुषांचे विचार समाजाला एकत्र आणण्यासाठी होते; पण त्यांच्या पुतळ्यांवरून समाजात नवे गट निर्माण होत असतील, तर आपण मूळ ध्येयापासून दूर जातो.या प्रक्रियेत सर्वात जास्त नुकसान होते ते तरुण पिढीचे. त्यांना विचारांची ओळख करून देण्याऐवजी आपण त्यांना प्रतीकांची पूजा शिकवतो. प्रश्न विचारण्याची सवय कमी होते. विवेक मागे पडतो. "कोणी काही सूचना दिल्या तर तो विरोधक" अशी मानसिकता तयार होते. लोकशाहीचा आत्मा म्हणजे प्रश्न विचारणे, चर्चा करणे, मतभेद मान्य करणे. पण पुतळ्यांच्या राजकारणात मतभेदांना जागा नसते; तिथे केवळ घोषणा आणि आरोप असतात.पुतळे उभे राहू नयेत, असा अतिरेकी निष्कर्ष योग्य नाही. स्मरण आवश्यक आहे. पण स्मरणासोबत विवेक हवा. सर्व महापुरुषांचे पुतळे एकाच ठिकाणी, एकाच शहरात, एकाच आकाराची, एकाच उंचीची असावीत कारण आकार आणि उंचीने महानता सिद्ध होत नाही. तसे पुतळे अधिक म्हणजे कार्य अधिक असेही नाही. खर्चाची पारदर्शकता हवी. देखभालीची तरतूद हवी. सर्वांत महत्त्वाचं प्राधान्यक्रम स्पष्ट हवा. विकासाच्या मूलभूत गरजा पूर्ण केल्यानंतर स्मारकं उभी राहिली, तर त्यात गैर नाही. पण विकासाआधी प्रतीकांना प्राधान्य दिलं, तर प्रश्न विचारले जातीलच.महाराष्ट्र हा विचारांचा, सुधारकांचा, क्रांतिकारकांचा प्रदेश आहे. इथे महापुरुषांनी समाजाला प्रश्न विचारायला शिकवलं. आज त्यांच्याच नावाने उभ्या राहणाऱ्या पुतळ्यांकडे पाहताना आपण स्वतःलाच विचारलं पाहिजे आपण त्यांच्या विचारांच्या उंचीपर्यंत पोहोचतो आहोत का, की फक्त त्यांच्या पुतळ्यांची उंची वाढवतो आहोत?इतिहास कॉंक्रीटमध्ये नव्हे, तर कृतीत जिवंत राहतो. पुतळे काळानुसार झिजतात, रंग उडतो, धातू गंजतो. पण विचार जिवंत राहिले, तर समाज पुढे जातो. महाराष्ट्राने ठरवायचं आहे आपण पुतळ्यांच्या सावलीत उभं राहणार आहोत, की विचारांच्या प्रकाशात चालणार आहोत?नाहीतर उद्या प्रत्येक चौकात पुतळे असतील; पण त्या चौकातून जाणाऱ्या लोकांच्या मनात संशय, राग आणि अविश्वास असेल. कॉंक्रीटच्या मूर्ती उभ्या राहतील; पण जिवंत समाज तुटत जाईल. इतिहास विचारेल तुम्ही महापुरुषांच्या नावाने किती उंच पुतळे उभारले, हे सांगू शकाल; पण त्यांच्या विचारांची उंची किती वाढवली, हे सांगू शकाल का?निर्णय आपल्या हातात आहे. महाराष्ट्राची खरी ओळख कॉंक्रीटच्या उंचीने ठरणार नाही; ती ठरेल समाजातील समतेने, न्यायाने आणि विकासाने. पुतळे उभे राहू द्या पण त्याहून आधी आणि त्याहून उंच विचार उभे राहू द्या. अन्यथा ही उंचीची शर्यत एक दिवस महाराष्ट्रालाच खोल दरीत ढकलून देईल.महाराष्ट्राची खरी उंची संगमरवरी पुतळ्यांत नसून विचारांच्या उंचीमध्ये आहे. विकास म्हणजे शिक्षणाची गुणवत्ता, आरोग्य सुविधा, उद्योगांची निर्मिती, रोजगाराच्या संधी आणि सामाजिक सलोखा. जर आपण ही दिशा विसरलो, तर पुतळ्यांची उंची वाढेल; पण समाजाची उंची मात्र कमी होईल.




**प्रा. अभय जायभाये**

समाजशास्त्र विभागप्रमुख

आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे

जि. सातारा ९९२३५७५५०१